# पंचानन हयवाहन

Panchanan Hayavahan — Khandoba Aarti · Samarth Ramdas Swami

पंचानन हयवाहन सुरभूषितनीळा ।
खंडामंडित दंडित दानव अवलीळा ॥
मणिमल्ल मर्दुनियां जों धूसुर पिवळा ।
हिरे कंकण बाशिंगे सुमनांच्या माळा ॥१ ॥

> जय देव जय देव जय शिव मल्हारी हो स्वामी मल्हारी ।
> वारीं दुर्जन वारी निंदका पहारी ॥ धृ. ॥

सुरवर संवर वर दे मजलागी देवा ।
नाना नामे गाईन ही तुमची सेवा ।।
अघटित गुण गाया वाटतसे हेवा ।
फणिवर शिणला किती नर पामर केवा ॥ जय ॥ २ ॥

रघुवीरस्मरणी शंकर हृदयीं निवाला ।
तो हा मल्लंतक अवतार झाला ।।
तो यालागी आवडे भावे वर्णिला भक्ती वर्णिला |
रामे रामदासा जिवलग भेडला ॥ जय ॥ ३ ॥